ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाची गरज

**डॉ. मुंढे संदिपान दत्तात्रय**
सहायक अधिव्याख्याता, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग,
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट.

**सार :-** सध्याचे युग हे वेगवान युग आहे. सर्वच कामे वेगाने होत आहेत. कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त कामे करण्यावर भर दिला जात आहे. सर्वच क्षेत्रात वेळेची बचत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करण्याचे काम चालू आहे. ग्रंथालयानी पण वाचकांना सेवा देत असताना विविध तंत्रज्ञान स्विकारत जास्तीत जास्त प्रभावीपणे सेवा देण्यास सुरूवात केली आहे. साधारण वीस ते पंचविस वर्षापूर्वी ग्रंथालयातील वाचन साहित्याचा म्हणावा तसा प्रभावीपणे वापर होत नव्हता. पण ग्रंथालयानी काळानुरूप आधुनिक तंत्रज्ञान स्विकारत ग्रंथालयीन सेवा देण्याची व्याप्ती वाढविली असल्याचे दिसून येते. ग्रंथालये संगणकीकरणाच्या माध्यमातून विविध आज्ञावलीचा स्विकार करित वाचकांना अधिक पध्दतीने चांगल्या सेवा देत असल्याचे दिसून आहे. तसेच ग्रंथालयाचा जलद वापर होण्यासाठी तसेच सुरक्षिततेसाठी आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञान खुपच गरजेचे आहे.

**कि वर्डस :-** महाविद्यालयीन ग्रंथालय, आर.एफ.आय.डी.

**प्रस्तावना :-**सध्याच्या युगात ग्रंथालये नविन नविन तंत्रज्ञान स्विकारत आहेत. ग्रंथालयात येत असलेल्या वाचकाच्या नोंदी, ग्रंथालयात येत असलेले विविध प्रकारचे साहित्य तसेच ते वितरण करणे यासाठी विविध मार्ग स्विकारले जात आहेत. यासाठी एक चांगला प्रयत्न म्हणजे ग्रंथालयात आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाचा वापर करणे होय. हे तंत्रज्ञान सध्याच्या परिस्थितीत खुपच महागडे असल्याचे दिसून येते. हे तंत्रज्ञान रेडिओ लहरिच्या माध्यमार्फत कार्य करत असल्याचे दिसून येते. ग्रंथ देवघेव करणे व इतर कामे करण्यासाठी रेडिओ लहरीचे प्रभाव क्षेत्र निर्माण केले जाते. ग्रंथालयात टॅग आणि रीडर मशीनमधील लहरीच्या संपर्कातून कामे होण्यास मदत होत असल्याचे दिसून येते. यामूळे ग्रंथालयातील वाचन साहित्य गहाळ होण्याच्या प्रमाणात घट होत असल्याचे दिसून येत आहे. हे तंत्रज्ञान ग्रंथालयासाठी अंत्यत उपयुक्त आहे. याच्या वापरामूळे ग्रंथालयात मनुष्यबळाची असलेली कमतरता जाणवत नाही. एकंदरीतच हे तंत्रज्ञान ग्रंथालयासाठी अंत्यत गरजेचे असल्याचे दिसून येत आहे. आगामी कालखंडात हे परवडण्यासारखे असेल व जवळपास सर्वच ग्रंथालयात याचा वापर चालू होवून ग्रंथालये अधिक कार्यक्षमतेने कार्य करण्यास सिध्द होतील असे दिसून येते.

**महाविद्यालयीन ग्रंथालय :-** या प्रकारच्या ग्रंथालयातील वाचक हा तरूण असतो. त्यांच्यासाठी संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, क्रमिक पुस्तके, संगणक, दृक श्राव्य माध्यमे इत्यादी गोष्टींचा संग्रह, इतर ललित व ललितोतर साहित्याबरोबर असावा.[1]

**आर.एफ.आय.डी. :-** ग्रंथालय साहित्याची ओळख किंवा डेटा जो छोटयाशा मायक्रोचिपमध्ये साढविलेला अशा टॅगसहित ग्रंथ घेवू वाचक आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञान प्रभवित क्षेत्रातून नुसता चालत गेला तरी देवघेव व्यवहार पुर्ण करणारे आधुनिक तंत्रज्ञान आहे.[2]

महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी आर.एफ.आय.डी.

**तंत्रज्ञानाची गरज :-** महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये विविध प्रकारचे वाचन साहित्य असते. महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक तसेच स्थानिक नागरिक या प्रकारचे वाचक त्याचा फायदा घेत असतात. ग्रंथालय लहान असो किंवा मोठे असो त्यात नियीमत कालखंडाने वाचनसाहित्यात वाढ होत असते. हि होणारी वाढ व त्याचा योग्य वापर तसेच या वाचकाना जलद प्रकारची सेवा देण्यासाठी तसेच खालील बाबी साध्य करण्यासाठी आर.एफ.आय.डी. या तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथालयाशी संबधीत विविध स्वरूपाची कार्ये होण्यास मदत होते.

**1. ग्रंथालय सुरक्षिततेसाठी :-**ग्रंथालयात मोठया संख्येने वाचक येत असतात. त्यातील काही अल्प प्रमाणातील वाचक हे ग्रंथालयातील ग्रंथ चोरून नेण्याचा प्रयत्न करित असतात. ग्रंथ हे ग्रंथालयाची संपत्ती असतात. हे रोखण्यासाठी ग्रंथालये विविध प्रकारचे प्रयत्न करित असतात. पण त्यातील सर्वात चांगला मार्ग म्हणजे ग्रंथालयात आर.एफ.आय.डी. हे तंत्रज्ञान स्विकारणे होय. यामूळे वाचकांने ग्रंथ घेतल्यानंतरच तो ग्रंथ गेट सेंसर गेट पार करू देतो. अन्यथा तो ग्रंथालयीन कर्मचारी वर्गास अलार्म वाजवून सुचना देतो. म्हणूनच ग्रंथालय सुरक्षितेतेसाठी आर.एफ.आय.डी. हे खुपच उपयूक्त असल्याचे दिसून येते.

**2. ग्रंथ गहाळ होण्याचे प्रमाण रोखण्यासाठी :-** ग्रंथालयातील वाचक ग्रंथ वाचन झाल्यानंतर ग्रंथाच्या जागेवर ग्रंथ न ठेवता तो कोठेही ठेवतात. तसेच ग्रंथालयातील ग्रंथ ठेवण्याच्या जागेत बदल झाल्यामूळे या असंख्य ग्रंथातून वाचकाला आवश्यक ग्रंथ शोधणे कठीण ठरते. त्यामूळे ग्रंथ ग्रंथालयातून गहाळ होण्याचे प्रमाण वाढते. यावेळेस ग्रंथालयात जर आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञान वापरात असेल तर त्या ग्रंथाची नेमकी जागा समजण्यास मदत होते तसेच तो ग्रंथ गहाळ होण्यापासून रोखला जातो व ग्रंथालयातील ग्रंथ जतन होवून ग्रंथ गहाळ होण्याचे प्रमाण कमी होते.

**3. वाचन साहित्याची जलद देवघेव करण्यासाठी :-** ग्रंथालयात विविध प्रकारच्या वाचन साहित्याची देवघेव होत असते. ग्रंथालयात पारंपारिक पध्दतीनुसार तसेच ग्रंथालयात संगणक आज्ञावलीचा वापर केलेला असेल तर त्या आज्ञावलीतील देवघेव पध्दतीनुसार वाचनसाहित्याचे देवघेव करण्याचे काम चालू असते. हे काम जास्त वेळ घेणारे असल्याचे आपणास दिसून येते. त्यामानाने आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानात हे काम ड्रॉप बॉक्सच्या माध्यमातून होत असते. यात देवघेव करीत असताना वाचकाला या ड्रॉप बॉक्समध्ये वाचनसाहित्य ठेवावयाचे असते. देवघेव प्रक्रिया आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानामार्फत स्वयंचलित पध्दतीनुसार होते. यामूळे वाचकाचा वेळ वाचण्यास मदत होते. थोडक्यात ग्रंथालये आता संगणकीकरण ते स्वयंचलित होत असल्याचे दिसून येते.

**4. साठा पडताळणी करण्यासाठी :-**महाविद्यालयीन ग्रंथालय जर लहान असेल तर दरवर्षी व मोठे असेल तर दर तीन वर्षानी साठा पडताळणी करण्याचे काम केले जाते. या कामातून ग्रंथालयातील ग्रंथ परिगणना करून गहाळ ग्रंथ किती झालेत याचा अहवाल तयार केला जातो. लिखित स्वरूपात किंवा बारकोडच्या साहयाने काम करण्यासाठी जास्त मनुष्यबळ तसेच हे काम करण्यासाठी कालावधी पण जास्त लागत असतो. पण आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाच्या साहयाने हे काम अतिशय कमी वेळेत होते. म्हणून आर.एफ.आय.डी. हे साठा पडताळणी करण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

**5. जलद पध्दतीने चेक इन व चेक आऊट पध्दतीचा वापर करण्यासाठी :-** ग्रंथालयात वाचकांच्या नोंदीसाठी विविध प्रकार अवंलबीले जातात. रजिस्टर वर येण्या

व जाण्याची नोंद करणे तसेच वाचक नोंद बार कोड स्कॅनरच्या साहयाने करणे या प्रकारे नोंद होत असते. हि पध्दत वेळ घेणारी असते. आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वयंचलीत पध्दतीने चेक इन व चेक आऊट वाचकाची नोंद होत असते. तसेच ती माहिती तारखेनुसार उपलब्ध होते म्हणूनच जलद पध्दतीने चेक इन व चेक आऊट पध्दतीचा वापर करण्यासाठी आर.एफ.आय.डी. हे तंत्रज्ञान उपयुक्त आहे.

**6. गहाळ झालेले वाचनिय साहित्य शोधण्यासाठी :-** ग्रंथालयात विविध प्रकारचे वाचक येत असतात. त्यांचे वाचनसाहित्य वेगवेगळया ठिकाणी ठेवण्यात येत असते. एकंदरितच ग्रंथालयात ग्रंथ संख्या मोठी असल्याने त्यातून ग्रंथ जर सुनियोजीत जागेवर उपलब्ध नसेल तर तो शोधणे कठीण होत जाते. ग्रंथालयातील कर्मचारी वर्गाकडून पण कधी कधी ग्रंथ चुकीच्या जागेवर ठेवले जातात. असे गहाळ झालेले वाचनिय साहित्य शोधण्यासाठी आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाची मदत घेवून ते साहित्य शोधता येते म्हणूनच हे ग्रंथालयासाठी उपयुक्त असे तंत्रज्ञान आहे.

**7. ग्रंथालयीन कर्मचारी व वाचकांचा वेळ वाचविण्यासाठी :-**आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानामूळे ग्रंथ देवघेव, वाचक नोंद तसेच साठा पडताळणी यासारखी अनेक कामे स्वयंचलीत पध्दतीने होत असतात. यामूळे ग्रंथालयीन कर्मचारी तसेच ग्रंथालयात येणारे वाचक याचा वाया जाणारा वेळ वाचतो तसेच त्यांना प्रभावीपणे ग्रंथालयीन सेवा मिळताता. यावरून डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी वाचकाचा वेळ वाचला पाहिजे या सिध्दांताची पुर्तता होत असल्याचे दिसून येते.

**समारोप :-**एकंदरीतच हे तंत्रज्ञान ग्रंथालयासाठी उपयुक्त असल्याचे दिसून येते. यामूळे ग्रंथालयीन कामकाज तसेच वाचकांना विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठी जलद प्रकारे कार्य करणारे उपयुक्त तंत्रज्ञान असल्याचे दिसून येते. आपल्या देशातील काही मोजक्याच ग्रंथालयात याचा वापर चालू आहे कारण हे तंत्रज्ञान खुपच महाग आहे. सर्वसामान्य महाविद्यालयीन ग्रंथालयापर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचण्यासाठी याची किंमत स्वस्त तसेच परवडेल अशी होणे गरजेचे आहे. या तंत्रज्ञानामुळे ग्रंथालय म्हणजे जलद गतीने माहितीचे प्रसारण तसेच संदेशवहन करणारे केंद्र ठरण्यास मदत होईल.

**संदर्भ :-**

1. *कोण्णूर एम. बी. आणि कोण्णूर सुजाता. (2008). डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश. पुणे, डायमंड पब्लीकेशन्स.*
2. *फडके द. ना. (2015). ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण. पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.*